**साक्षीदार क्र. २**

**मी याव्दारे प्रतिज्ञेपुर्वक निवेदन करतो की,**

**नाव : मुकूंद सखाराम ठाणगे,**

**वय : ४८ वर्ष, धंदा: चालक व शेती,**

**रा. साईनाथ नगर, नेवासा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर**

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेमार्फत सुरु :**

आमच्या घरात मी, माझी पत्नी मोहिनी व मुलगा प्रसन्न असे मिळुन राहतो. दि. ०१/०५/२०२५ रोजी मी व माझी पत्नी मयताच्या कार्यक्रमासाठी सकाळी ९ वाजता मोटार सायकलवर उंदीरगाव येथे गेलो होतो. मयतीचा कार्यक्रम झाल्यानंतर घरी परत येत असताना श्रीरामपुर रोडवर अजिंठा हॉटेल समोर आमचा साधारण सकाळी साडेअकराच्या सुमारास अपघात झाला. पाठीमागुन भरधाव वेगात येणारी पांढ-या रंगाची टाटा कंपनीची चारचाकी वाहन क्रमांक एम.एच. १७ सी.एक्स. ४५८० ने आम्हाला पाठीमागुन जोराची धडक दिली. सदर अपघ ाातामुळे माझ्या पायाला, कॉलर बोनला, छातीच्या फासळ्यांना, डोक्याला मार लागला असुन माझ्या पायात रॉड आहे व माझ्या छातीच्या दोन बाजुच्या दोन बरगड्या टिचलेल्या आहेत. तसेच माझ्या पत्नीला बराच मार लागला असुन तिचे दोन्ही हात फ्रक्चर आहेत, एका पायाला दिडशे टाके असुन दुस-या पायाला सत्तर टाके आहेत. तिच्या जखमेच्या पट्ट्या अजुन चालु आहेत. माझ्या पत्नीच्या कानाच्या मागे टाके पडलेले आहेत. त्यानंतर आम्हाला पाहुण्यांनी मॅक्स केअर हॉस्पीटल नगर येथे दाखल केले. माझ्या डोक्याला मार लागल्यामुळे मला शुध्द नव्हती. त्यामुळे मला तक्रार दाखल करण्यास उशीर झाला. माझ्या पत्नीने आधीच तक्रार दाखल केली होती. धडक देणारे वाहन दिपक कैलास सिंग नावाची व्यक्ती चालवित होती. सदर व्यक्तीचे नाव मला मुलाकडुन समजले. मी आरोपीला घटनास्थळी पाहिले होते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण,**

**मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.01.27 05:45:03 +0530

दिनांक :- २७/०१/२०२६

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.

**मध्यान्हानंतर सा. क्र. १ मुकूंद सखाराम ठाणगे यांचा उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ ॲड. श्री. बी. जे. चव्हाण यांचे मार्फत सुरु-**

मी इयत्ता दहावी पर्यंत शिकलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, नेवासा-श्रीरामपुर हा रस्ता माझ्या माहितीतील आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे नेवासा-श्रीरामपुर रस्त्याने जाणे-येणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावर दुभाजक नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, काही ठिकाणी दुभाजक आहे व काही ठिकाणी दुभाजक नाही. हे म्हणणे खरे आहे की, नेवासा-श्रीरामपुर रस्ता पुर्व-पश्चिम आहे. हे म्हणणे खरे आहे की, नेवासा-श्रीरामपुर रस्त्यावर वाहनांची वर्दळ आहे.

हे म्हणणे खरे आहे की, आम्ही नेलेली मोटार सायकल आमच्या स्वतच्या मालकीची नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, स्वतचे वाहन असल्यास त्यामध्ये काय तांत्रीक अडचण आहे याबाबत आपल्याला माहिती असते. हे म्हणणे खरे नाही की, ती दुचाकी माझ्या वापरातील नव्हती. उंदीरगाव ते नेवासा हे अंतर ३२ किलोमिटर आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते अंतर जावुन येवुन ६४ किलोमिटर आहे. आम्ही अंतविधी करुन सकाळी १०.३० च्या आसपास परत निघालो. हे म्हणणे खरे नाही की, समोरुन येणा-या वाहनाने मला हुल दिल्यामुळे माझे वाहन स्लिप होवुन पडले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे सदरचा अपघात झाला व त्यामुळे मला जखमा झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा अपघाताशी संबंध नाही. हे मी सांगु शकत नाही की, एम.एच.१७ सी.एक्स. ४५८० हे वाहन आरोपी चालवित नव्हता.

हे म्हणणे खरे आहे की, नुकसान भरपाई मिळणेकामी मी व माझ्या पत्नीने जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपघाताची नुकसान भरपाई मिळावी अशी माझी इच्छा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर नुकसान भरपाई मिळावी म्हणुन मी आज रोजी साक्ष नोंदवित आहे. हे म्हणणे खरे आहे की, चालकाचे नाव मला मुलाने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार आमच्या गावातील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ते माझ्या परिचयाचे आहेत.

अपघाताबाबत पोलिसांनी माझा जबाब नोंदविला. पोलिसांनी माझा जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविला. मी जबाब देत असताना पोलिसांना असे सांगितले होते की, माझ्या पत्नीच्या एका पायाला दिडशे टाके व दुस-या पायाला सत्तर टाके आहेत. आता मला माझा जबाब दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा मजकुर माझ्या जबाबात नमुद नाही. परंतु सदरचा मजकुर माझ्या जबाबात नमुद नसण्याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही

की, मी सरतपासात सांगितलेला सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे प्रत्यक्ष घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतचा अपघात माझ्या चुकीमुळे झाला व प्रस्तुतच्या अपघातात आरोपीचे चुकी नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी केस दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.01.27 05:45:10 +0530

दिनांक :- २७/०१/२०२६

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.